केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाकरीता (NDCPS) सामाजिक विशेष घटक योजनेंतर्गत सन २०१८-१९ मधील केंद्र हिश्श्यापोटी रू.७०.०० लक्ष व राज्य हिश्श्यापोटी रु.४६.६७ लक्ष अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएचएम-०९१८/प्र.क्र.४४१/आरोग्य-७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १५ मार्च, २०१९

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२/०४/२०१८.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. G.२७०१८/०१/२०१८-NHM- F-E, दिनांक ७ जानेवारी, २०१९.
३) संचालक, वित्त व लेखा, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र.राआसोम/एफएमजी/ कें. रा.हि./१०७४६६-४७३/२०१८-१९, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

ग्रामिण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल, २००५ पासून राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान सुरू केले आहे. सदर योजनेअंतर्गत राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष घटक योजनेंतर्गत (SCSP) करीता सन २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) व एकात्मीक रोग सर्वेक्षण प्रकल्प (IDSP) करीता प्राप्त झालेल्या ६०% केंद्र हिस्सा त्यास समरुप ४०% राज्य हिश्श्याचे अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन परिपत्रकातील परिच्छेद-४ मधील तरतुदीनूसार याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण (NDCPS) कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष (SCSP) घटकाकरीता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने त्यांचा ६० टक्के हिस्सा राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) करीता रु.३९.०० लक्ष व एकात्मीक रोग सर्वेक्षण प्रकल्प (IDSP) करीता रु.३१.०० लक्ष एवढा निधी वितरीत केलेला आहे. त्यास अनुसरुन राज्य शासनाने ४० टक्के हिश्श्यापोटी राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) करीता रु.२६.०० लक्ष व एकात्मीक रोग सर्वेक्षण प्रकल्प (IDSP) करीता रु.२०.६७ लक्ष इतका समरुप राज्य हिस्सा वितरीत करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाकरीता सामाजिक विशेष घटकाकरिता (SCSP) रु.७०.०० लक्ष (रुपये सत्तर लक्ष फक्त) इतकी रक्कम ६०% केंद्र हिस्सा म्हणून तर त्यास समरुप ४०% म्हणजेच रु.४६.६७ लक्ष (रुपये शेहेचाळीस लक्ष सदुसष्ट हजार फक्त) इतका राज्य हिस्सा राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

६० % केंद्र हिस्सा

अ. क्र.	तपशील	लेखाशिर्ष	अर्थ संकल्पिय तरतुद (रु. लाखात)	मागणी रक्कम (रु. लाखात)
१	२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(०८) राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) करीता (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०F५३१	९१.७२	३९.००
२	२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(१०) एकात्मीक रोग सर्वेक्षण प्रकल्प (IDSP) (केंद्र हिस्सा ६०%) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने	२२१०F५५१	३२.४८	३१.००
	एकूण		१२४.२०	७०.००

४०% राज्य हिस्सा

अ. क्र.	तपशील	लेखाशिर्ष	अर्थसंकल्पिय (मुळ व पुरक) तरतुद (रु. लाखात)	मागणी रक्कम (रु. लाखात)
१	२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(०९) राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (NVBDCP) करीता (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०F५४२	९७.७७	२६.००
२	२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च ७८९ सामाजिक विशेष घटकाकरिता (०१)(११) एकात्मीक रोग सर्वेक्षण प्रकल्प (IDSP) (राज्य हिस्सा ४०%) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदाने	२२१०F५६९	४३.४३	२०.६७
	एकूण		१४१.२०	४६.६७

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद केलेल्या योजना निहाय ६०% केंद्र हिश्श्यापोटी ४०% राज्य हिश्श्यापोटी नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१८-१९ साठी मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. वित्त विभागाच्या दिनांक २ एप्रिल, २०१८ सोबतच्या परिशिष्टामधील अनु.क्र.८ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटींची व शर्तीची पुर्तता होत असल्याचे संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

यांनी प्रस्तावासह सादर केलेल्या प्रमाणपत्राप्रमाणे यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत. तसेच सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच, भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरिल निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅंक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित केले आहे.

५. वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक २५ एप्रिल, २०१३ नुसार उपरोक्त निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (UC) सादर केल्यानंतरच पुढील अनुदान वितरीत करण्यात येईल.

६. सदर प्रस्तावावरील खर्च शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार आवश्यक तेथे करावयाच्या खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

७. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १०७/अर्थोपाय, दिनांक २ मार्च, २०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201903151228589517 असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.15 17:45:52 +05'30'

(निलेश फाळके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. अति. संचालक, कु.क. कार्यालय, पूणे
६. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
११.कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१२.निवडनस्ती (आरोग्य -७) .